# जठर व पक्वाशय यांस व्रण

## जठर व पक्वाशयाचा व्रण म्हणजे काय?

जठर व पक्वाशयाचा व्रण ही एक प्रकारची जखम जठर, लहान आतडे व अन्ननलिकेच्या आतील अस्तरावर होते. जठरात होणारे व्रण पक्वाशयातील व्रण म्हणजेच लहान आतडयात होणारे व्रण. जठर व पक्वाशयातील व्रण थोडया तसेच प्रदीर्घ कालपर्यंत राहतात.

## कारणे-

- हॅलिकोबॅक्टर पायलरी (H-Pylori) या जीवाणूमुळे जठरात व्रण निर्माण होऊन जठराचा दाह सुरु होतो.
- ॲस्प्रीन, आयबुप्रोफेन आणि इतर दाह रोधक औषधे (अशी प्रवृत्ती महिलांमध्ये व 60 वर्षांवरील वृध्दामध्ये आढळते)
- धुम्रपान
- अति मद्यपान
- रेडिएशन उपचार




## चिन्हे आणि लक्षणे-

- नाभी कडून सुरुवात होऊन छातीकडे वेदना होतात.
- भुकेच्या सवयीत बदल
- मळमळ
- रक्तमिश्रीत काळा मल
- अवर्णनीय वजन वाढ
- अपचन
- उलटया
- छातीत दुखणे

## निदान-,

- एच पायलोरी जीवाणू शोधण्यासाठी रक्ततपासणी
- मलाची प्रयोशाळेत तपासणी. त्यामध्ये एच. पायलोरी किंवा रक्त आहे का ते समजेल.
- पचनसंस्थेची दुर्बिणीच्या सहाय्याने अंतर्गत तपासणी (endoscopy) यासाठी एका लांब लवचिक नळीवर दिवा बसूवन तो पचनसंस्थेच्या पोकळीत सोडला जातो. त्यावरील कॅमे-याच्या सहाय्याने पचनसंसथेच्या आतील भागाची चित्रें घेतली जातात व त्यांचे परिक्षण केले जाते.
- पोटाच्या वरच्या भागाच्या म्हणजेच जठराचा लहान आतडयाच्या आतील भागाचा एक्स-रे काढून तो तपासणीसाठी पाठविला जातो. याप्रक्रियेपूर्वी रुग्णांस खडूच्या रंगाचे (पांढरे) पेय पिण्यास दिले जाते. त्यामुळे एक्य-रे व्यवस्थित येतो. या एक्स-रे मुळे रुग्णांस व्रण आहेत का हे समजते.

## उपचार-

- जठरातील आम्लाचे (जठररस) प्रमाण कमी करण्यासाठी औषधे दिली जातात. रुग्णाच्या जठराच्या आतील अस्तराचे आम्लापासून व एच-पायलरी या जीवाणूपासून रक्षण होण्यासाठी प्रतिजैविके औषधे दिली जातात.
- औषधोपचाराने व्रण बरे न झाल्यास शस्त्रक्रिया करण्याची वेळ येते. जठरात आम्लाची निर्मीती व्हावी यासाठी संबंधित चेतातंतूची शस्त्रक्रिया करावी लागते. शस्त्रक्रियेच्या दुस-या प्रकारात शस्त्रक्रियेद्वारे जठराचा काही भाग काढला जातो. एखाद्या व्रणाने जठर व लहान आतडयामध्ये छेद गेला असल्याचे आढळल्यास त्यावरही शस्त्रक्रिया केली जाते.

## रुग्ण समुपदेशन-

- तंबांखू उत्पादने टाळावी.
- मद्यपान करु नये
- ॲस्प्रीन व इतर दाह रोधक नॉनस्टीरॉइड औषधे काळजीपुर्वक वापरावी.
- व्रणाची लक्षणे आढळल्यास दुर्लक्ष करु नये
- नियमितपणे हात स्वच्छ धुवून कोणत्याही प्रकारचा संसर्ग होणार नाही याची काळजी घ्यावी. योग्य पध्दतीने शिजवलेले अन्न खावे.


Reference : Micromedex online solution